पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १०५९ /२०२३ दि. २८/०७/२०२३

## ''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''

**ज्याअर्थी,** मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २९/०७/२०२३ रोजी **'मोहरम (ताजिया)'** सणानिमित्त मुस्लिम बांधवांतर्फे भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणुकीचे वेळी ९०,००० ते १,००,००० जनसमुदाय सहभागी होणार आहेत. सदर मिरवणूक शिमला पार्क येथून सुरू होवून मुंब्रा रेतीबंदर पर्यंत जावून विसर्जन होणार आहे. मोठया प्रमाणात जनसमुदाय एकत्र आल्यास सदर मिरवणुकीचे वेळी तसेच मिरवणुकीनंतर कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरीता सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण फाटा, शिळफाटा कडून मुंब्रा शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

२) कळवा, खारेगाव कडून मुंब्रा शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेतीबंदर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मुंब्रा बायपास (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र. ४) मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **'मोहरम (ताजिया)'** सणाच्या दिवशी म्हणजे **दिनांक २९/०७/२०२३ रोजी दुपारी १३:०० ते २२:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.

CamScanner

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. वाहतूक उपविभाग ठाणे.

CS CamScanner